मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# चिंचवडमध्ये पत्नीकडून पतीचा गळा आवळून खून

## चारित्र्याच्या संशयातून घरगुती वाद विकोपाला; चिंचवड पोलिसांनी आरोपी पत्नीला अटक

**पिंपरी | प्रतिनीधी**

चिंचवड पोलिस ठाणे हद्दीतील माणिक कॉलनी, लिंक रोड परिसरात शुक्रवारी (दि. २४) पहाटे सामाजिक कार्यकर्ते नकुल आनंद भोईर (वय ४०, रा. भोईर कॉलनी, चिंचवड) यांचा त्यांच्या पत्नीने गळा आवळून खून केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. ही घटना पहाटे अंदाजे अडीत ते पावनेतीनच्या सुमारास घटना घडली असून आरोपी पत्नी चैताली नकुल भोईर (वय २८, रा. माणिक कॉलनी, चिंचवड) हिला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.



पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना माणिक कॉलनीतील महानगरपालिकेच्या आरोग्य कार्यालयाच्या इमारतीत घडली. पती-पत्नीमध्ये काही दिवसांपासून वाद सुरु होते. मयत नकुल भोईर हे पत्नी चैतालीवर चारित्र्याच्या संशयातून वारंवार वाद घालत होते. या वादातूनच चैताली हिने रागाच्या भरात नकुल भोईर यांचा कापडाने गळा आवळून खून केला, अशी प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली.

> पहाटे पावणे तीनच्या सुमारास ही घटना घडली आहे. पत्नीने पतीचा कापडाने गळा आवळून हत्या केली. चिंचवड पोलिसांनी चैताली भोईरला ताब्यात घेतले आहे. अधिक तपास सुरू आहे.
>
> – पोलिस निरीक्षक गोसावी

मयत नकुल भोईर हे मराठा सेवा संघ आणि संभाजी ब्रिगेड या संघटनांमध्ये पदाधिकारी म्हणून कार्यरत होते. तसेच, ते सामाजिक कार्यकर्ते आणि सर्पमित्र म्हणून परिचित होते. नकुल भोईर आणि चैताली भोईर हे दोघेही आगामी पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी इच्छुक होते. त्यांच्या हत्येमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

घटनेची माहिती मिळताच चिंचवड पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह पोस्टमार्टेमसाठी पाठविण्यात आला आहे. आरोपी चैताली भोईरला पोलिसांनी ताब्यात घेतले असून तिच्याकडून सविस्तर चौकशी सुरू आहे. या प्रकरणाचा अधिक तपास चिंचवड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# माजी नगरसेवक प्रविण भालेकर यांच्या हस्ते सफाई कर्मचाऱ्यांना साडी व मिठाई वाटप

## स्वच्छतेच्या या योद्ध्यांमुळे आपला परिसर सुशोभित राहतो; माजी नगरसेवक प्रविण भालेकर

**पिंपरी | प्रतिनीधी**

सणासुदीच्या काळातही शहर स्वच्छ ठेवण्यासाठी दिवस-रात्र सेवा देणाऱ्या महिला व पुरुष सफाई कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी माजी नगरसेवक प्रविण भालेकर यांच्या वतीने साडी, पोषाख व मिठाई वाटपाचा कार्यक्रम रुपीनगर तळवडे येथील जनसंपर्क कार्यालयात आयोजित करण्यात आला.

रुपीनगर-तळवडे प्रभागातील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील सफाई कर्मचारी दररोज पहाटेपासून तळवडे, रुपीनगर, त्रिवेणीनगर आणि सहयोगनगर परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी मेहनत घेत असतात. सण, उत्सव काळातही ही सेवा अखंड सुरू असते. त्यांच्या या योगदानाचा सन्मान म्हणून प्रविण भालेकर व मान्यवरांच्या हस्ते महिलांना साडी व पुरुषांना पोषाख तसेच मिठाईचे वाटप करण्यात आले.

यावेळी बोलताना माजी नगरसेवक प्रविण भालेकर म्हणाले, “स्वच्छतेच्या या योद्ध्यांमुळे आपला परिसर सुशोभित राहतो. त्यांच्या कार्याचे मनःपूर्वक कौतुक करतो आणि सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा देतो.”



कार्यक्रमाला ह.भ.प. रंगनाथ महाराज भालेकर, निवृत्त नायब तहसीलदार पुनाजी थिटे, ह.भ.प. काकासाहेब पडघन, बबन खामकर, नरेंद्र आण्णा भालेकर, औदुंबर पाडुळे, उद्योजक बाळासाहेब भालेकर, राकेश भालेकर, सागर भालेकर, गणेश भालेकर, रामभाऊ पडघन, संदीप भालेकर, दिगंबर भालेकर, प्रविण पोकळे, संतोष पोखरकर, बप्पा बेदरे, नेताजी तेरकर व सखाराम येवले यांसह अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त केले व दीपावलीपूर्वी आदरसन्मान मिळाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते.

# पिंपरीत दिवाळीमध्ये दररोज 1500 टन कचरा

## पिंपरी-चिंचवड महापालिकेने मुख्य बाजारपेठांबरोबरच संपूर्ण शहरातील कचरा उचलला

**पिंपरी | प्रतिनिधी**

दिवाळीनिमित्त बाजारात पूजा साहित्य, खरेदीसाठी झालेली गर्दी, फुले आणि फटाक्यांच्या आतषबाजीमुळे मुख्य बाजारपेठा आणि पिंपरी-चिंचवड शहराच्या प्रत्येक भागात मोठ्या प्रमाणावर कचरा निर्माण झाला होता. महापालिकेने मुख्य बाजारपेठांबरोबरच संपूर्ण शहरातील कचरा उचलला. त्यामध्ये दिवाळीचे सहाही दिवस सरासरी १५०० टन कचरा महापालिकेकडून उचलण्यात आला. दोनशे टनांनी कचऱ्यात भर पडल्याचे आरोग्य विभागाने सांगितले.



पिंपरी-चिंचवड शहरातील घरोघरचा कचरा घंटागाडीमार्फत संकलित केला जातो. मोशीतील कचरा डेपो येथे हा कचरा टाकला जातो. शहरात दररोज ओला आणि सुका असा सरासरी १३०० टन कचरा संकलित केला जातो. मात्र, दिवाळीत कचऱ्यात भर पडते. दिवाळीसाठी मागविलेल्या विविध वस्तूंचे बॉक्स, पुट्टे, फटाक्याचा कचरा वाढला आहे. मुख्य बाजारपेठांमध्ये मोठ्या प्रमाणावर विक्रेते पूजेचे साहित्य व विविध साहित्याचे स्टॉल लावत असतात.

> दिवाळीत कचरा संकलनात वाढ झाली आहे. घरोघरी, बाजारपेठेतील संकलनही वाढले. दिवाळीमध्ये दिवसाला १५०० टन एवढा कचरा जमा झाला.
>
> - सचिन पवार, उपायुक्त, आरोग्य विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका

दिवाळीचा पाडवा संपल्यानंतर स्टॉल हटविण्यात येतात. त्यानंतर संपूर्ण कचरा रस्त्यावरच पडतो. फुले, पूजा-साहित्याचा कचरा यामध्ये सर्वाधिक असतो.

दिवाळीच्या सुरूवातीपासूनच कचरा वाढत गेला. यामध्ये १८ ऑक्टोबरला धनत्रयोदशीला सर्वाधिक एक हजार ६३७ टन, १९ ऑक्टोबरला एक हजार ५०१ टन, २० ऑक्टोबरला नरक चतुर्दशीला एक हजार ५६० टन, २१ ऑक्टोबरला लक्ष्मीपूजनादिवशी एक हजार ५६७, २२ ऑक्टोबरला पाडव्यादिवशी एक हजार ४१३ टन आणि २३ ऑक्टोबरला एक हजार ४१७ टन कचऱ्याचे संकलन महापालिकेच्या आरोग्य विभागाने केले. नियमितच्या कचरा संकलनात यंदाच्या दिवाळीत दोनशे टन अतिरिक्त कचऱ्याची भर पडली असल्याची माहिती महापालिका अधिकाऱ्यांनी दिली. दिवाळीच्या दिवसात शहरात दररोज सरासरी १५०० टन एवढा कचरा जमा झाल्याचा अंदाज महापालिकेकडून वर्तविण्यात आला आहे. इतर दिवशी हा कचरा १३०० टन एवढा असतो.

# महापालिका सात शाळांमध्ये उभारणार अस्ट्रोनॉमी लॅब

## 2.5 कोटी रुपये खर्चून विद्यार्थ्यांसाठी उभारणार अत्याधुनिक प्रयोगशाळा

**पुणे | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना खगोलशास्त्राचे शिक्षण आणि ज्ञान मिळण्यासाठी पहिल्या टप्प्यात सात शाळांमध्ये अत्याधुनिक विज्ञान प्रयोगशाळा विकसित करण्यात येणार आहे. एका प्रयोगशाळेसाठी ३६ लाखांचा करण्यात येणार असून एकूण दोन कोटी ५० लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.




पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या १०५ प्राथमिक आणि १८ माध्यमिक शाळा असून, यामध्ये ५४ हजार ४१८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांना खगोलशास्त्राचे शिक्षण मिळण्यासाठी सात शाळांमध्ये लोकनेते आमदार लक्ष्मण जगताप अत्याधुनिक सायन्स प्रयोगशाळा विकसित करण्यात येणार आहे. त्यासाठी तीन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाचे उपसचिव यांनी प्रस्तावित कामकाजास दोन कोटी ५० लाख रुपये खर्चास प्रशासकीय मान्यता दिली आहे. महापालिका शाळेत अत्याधुनिक विज्ञान प्रयोगशाळा विकसित करण्यासाठी निविदा महाटेंडर प्रणालीवर १३ जुलै २०२५ ला प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यात तीन पुरवठादार ठेकेदारांनी सहभाग घेतला होता.

### खर्चास 'स्थायी'ची मान्यता

» पुण्यातील एका संस्थेचा प्रयोगशाळा विकसित करण्यासाठी ३५ लाख ७१ हजार ३०० रुपयांचा लघुत्तम दर स्वीकृत करण्यात आला आहे. सात शाळांचा खर्च एकूण दोन कोटी ४९ लाख ९९ हजार १०० रुपये इतका आहे. चिंचवड विधानसभा मतदारसंघातील महापालिकेच्या अकरापैकी सात शाळांमध्ये या प्रयोगशाळा विकसित करण्यात येणार आहेत.

» एका प्रयोगशाळेमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे एकूण ६४ प्रकारचे प्रकल्प असणार आहेत. शिक्षण विभागाच्या मागणीनुसार मध्यवर्ती भांडार विभागाकडून ही प्रक्रिया राबविण्यात आली आहे. या खर्चास आयुक्त तथा प्रशासक श्रावण हर्डीकर यांनी स्थायी समितीची मान्यता दिली आहे.

# कामचुकार अधिकारी आयुक्तांच्या रडारवर

## क्षेत्रीय कार्यालयांतील सहाय्यक आयुक्त आले अडचणीत, चार दिवसांत 12 जणांवर कारवाई

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेचा पदभार स्वीकारल्यानंतर आयुक्तांकडे अधिकार, तसेच कामासाठी पुरेसा निधी नसल्याची तक्रार करणारे पालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयांचे सहाय्यक आयुक्त चांगलेच अडचणीत सापडण्याची चिन्हे आहेत. आयुक्तांनी अधिकार आणि निधी वाढविल्यानंतरही त्याचा वापर न करणाऱ्या सहाय्यक आयुक्तांना दणका बसण्याची शक्यता आहे.

स्वच्छता, अतिक्रमण, अनधिकृत फ्लेक्स, रस्ते व सांडपाणी यांसारख्या पायाभूत सुविधा सुधारणाकडे दुर्लक्ष होत असल्याचे आयुक्तांना पाहणीत आढळले. त्यामुळे आयुक्त त्यांची थेट बदलीच करत आहेत. कामात गंभीर चुका होत असल्यास थेट निलंबनाची कारवाईचा इशारा आयुक्तांनी दिला असून, त्याची सुरुवातही केली आहे. त्यामुळे असे अधिकारी आयुक्तांच्या रडारवर आले आहेत.




### आयुक्तांची पाहणी करण्यास सुरुवात

» आयुक्तांनी सूचना देऊनही अशा तक्रारी वारंवार येत असून, त्यात प्रभाग स्तरावर पडलेला कचरा, रस्त्यांवरील अस्वच्छता, खराब सांडपाणी वाहिन्यांची, गल्ली-बोळातील रस्त्यांची तातडीची दुरुस्ती,अतिक्रमण आणि अनधिकृत फ्लेक्स आदी तक्रारींचा समावेश आहे. त्याची शहानिशा करण्यासाठी आता आयुक्तांनीच पाहणी करण्यास सुरुवात केली आहे. या वेळी समस्या तातडीने सोडविण्याच्या सूचना आयुक्त देत आहेत.

गेल्या साडेतीन वर्षांपासून पालिका प्रशासकांच्या ताब्यात आहे. नगरसेवक नसल्याने अधिकारी, कर्मचाऱ्यांवरील नियंत्रण कमी झाले आहे. नागरिक किंवा राजकीय पदाधिकारी समस्या घेऊन गेले, तरी कामे होत नसल्याची तक्रार येत आहे. काही अधिकारी कामावर उशिरा येणे, कार्यालयातून लवकर निघून जाणे यासारख्या प्रकारांत गुंतले आहेत. त्याचा परिणाम थेट शहराच्या कामकाजावर होत आहे. त्यातच क्षेत्रीय कार्यालयांकडून तक्रारीचे निवारण होत नसल्याच्या तक्रारी आयुक्तांकडे येत आहेत.

आयुक्तांनी सूचना देऊनही अशा तक्रारी वारंवार येत असून, त्यात प्रभाग स्तरावर पडलेला कचरा, रस्त्यांवरील अस्वच्छता, खराब सांडपाणी वाहिन्यांची, गल्ली-बोळातील रस्त्यांची तातडीची दुरुस्ती,अतिक्रमण आणि अनधिकृत फ्लेक्स आदी तक्रारींचा समावेश आहे. त्याची शहानिशा करण्यासाठी आता आयुक्तांनीच पाहणी करण्यास सुरुवात केली आहे. या वेळी समस्या तातडीने सोडविण्याच्या सूचना आयुक्त देत आहेत.

महापालिकेचा पदभार स्वीकारल्यानंतर आयुक्तांकडे अधिकार, तसेच कामासाठी पुरेसा निधी नसल्याची तक्रार करणारे पालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयांचे सहाय्यक आयुक्त चांगलेच अडचणीत सापडण्याची चिन्हे आहेत. आयुक्तांनी अधिकार आणि निधी वाढविल्यानंतरही त्याचा वापर न करणाऱ्या सहाय्यक आयुक्तांना दणका बसण्याची शक्यता आहे.

वाघोली, मांजरी, शेवाळवाडी, वडारवाडी आणि जनवाडी क्षेत्राची पाहणी केली असता अस्वच्छता, रस्त्यावर „वाहते„ सांडपाणी, पडलेला कचरा यांसह स्थानिक नागरिकांचा रोषही पाहिला. त्यानंतर नगर रस्ता- वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयाच्या सहाय्यक आयुक्तांसह दोन अभियंत्यांची बदली, हडपसर क्षेत्रीय कार्यालयाच्या सहाय्यक आयुक्तांची बदली, तसेच शाखा अभियंता, आरोग्य निरीक्षक, मुकादमांचे निलंबन केले. घोले रस्ता- शिवाजीनगर,क्षेत्रीय कार्यालयातील वरिष्ठ आरोग्य निरीक्षकांसह चार अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाईही केली.

### चार दिवसांत १२ जणांवर कारवाई

» आयुक्तांनी वाघोली, मांजरी, शेवाळवाडी, वडारवाडी आणि जनवाडी क्षेत्राची पाहणी केली असता अस्वच्छता, रस्त्यावर वाहते सांडपाणी, पडलेला कचरा यांसह स्थानिक नागरिकांचा रोषही पाहिला. त्यानंतर नगर रस्ता- वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयाच्या सहाय्यक आयुक्तांसह दोन अभियंत्यांची बदली, हडपसर क्षेत्रीय कार्यालयाच्या सहाय्यक आयुक्तांची बदली, तसेच शाखा अभियंता, आरोग्य निरीक्षक, मुकादमांचे निलंबन केले. घोले रस्ता- शिवाजीनगर क्षेत्रीय कार्यालयातील वरिष्ठ आरोग्य निरीक्षकांसह चार अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाईही केली.

# पुणे RTO ची मोठी घोषणा! HSRP नंबर प्लेट बसवण्याची अंतिम मुदत 'या' तारखेपर्यंत

## डिसेंबर 2024 पासून ही प्रक्रिया सुरू असून आतापर्यंत चार वेळा मुदतवाढ देण्यात आली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

एचएसआरपी नंबरप्लेटसंदर्भात पुणे परिवहन विभागाने मोठी घोषणा केली आहे. परिवहन विभागाने नागरिकांना एचएसआरपी बसवण्यासाठी अनेक वेळा मुदतवाढ दिली आहे. डिसेंबर 2024 पासून ही प्रक्रिया सुरू असून आतापर्यंत चार वेळा मुदतवाढ देण्यात आली आहे. आता पुन्हा एकदा नागरिकांसाठी मुदत वाढवण्यात आली आहे.

एचएसआरपी बसवण्याची अंतिम मुदत ३० नोव्हेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार २०१९ पूर्वीच्या वाहनांना ही नंबर प्लेट बसवणे बंधनकारक आहे. पुण्यात सुमारे २६ लाख वाहनांना ही प्लेट बसवायची आहे, पण आतापर्यंत केवळ नऊ लाख वाहनांनीच नोंदणी केली आहे. एक डिसेंबरनंतर एचएसआरपी नसलेल्या वाहनांवर वायुवेग पथक कारवाई करणार आहे.



### शेवटची तारीख कोणती?

» परिवहन विभागाने नागरिकांना एचएसआरपी बसवण्यासाठी अनेक वेळा मुदतवाढ दिली आहे. डिसेंबर 2024 पासून ही प्रक्रिया सुरू असून आतापर्यंत चार वेळा मुदतवाढ देण्यात आली आहे. आता पाचवी वेळ असून शेवटची मुदत 30 नोव्हेंबर पर्यंत वाढवण्यात आली आहे. तरीही केवळ नऊ लाख वाहनांच्या नोंदणीच्या आधारे उर्वरित 17 लाख वाहनांना अजून नंबर प्लेट बसवायची आहे त्यामुळे पुढील काळात किती वाहनांवर ही प्लेट बसवली जाईल हा प्रश्न उभा राहतो.

मुदत संपल्यावर एक डिसेंबरनंतर एचएसआरपी नसलेल्या वाहनांवर वायुवेग पथक कारवाई करेल. अशी माहिती राज्य परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांनी स्पष्ट केले आहे तर नागरिकांनी 2019 पूर्वीच्या वाहनांना एचएसआरपी नंबर प्लेट लावणे अत्यंत गरजेचे आहे. पुण्यात इतर शहरांच्या तुलनेत प्रतिसाद चांगला आहे, पण अंतिम मुदत न गेल्यानंतर कारवाई सुरू होईल. असा इशारा पुण्याचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्नील भोसले यांनी दिला आहे.

पुणेकरांनो एचएसआरपी नंबर प्लेटसंबंधी एक महत्त्वाची बातमी समोर आलेली आहे. पुण्यात वाहनांसाठी एचएसआरपी बसवण्याची अंतिम मुदत आता नोव्हेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार 2019 पूर्वीचे सर्व वाहनांना एचएसआरपी नंबर प्लेट बसवणे बंधनकारक आहे. पुण्यात सुमारे 26 लाख वाहनांवर ही प्लेट बसवायची आहे पण आतापर्यंत फक्त नऊ लाख वाहनांवरच नंबर प्लेट बसवली गेली आहे. त्यामुळे शहरातील 35-40 टक्के वाहनांनाच ही सुरक्षित नंबर प्लेट लागली आहे.

# ठरवून दिलेल्या दरापेक्षा अधिक दर आकारून प्रवाशांची लूट, 19 बसचालकांना दंड

## वेगवेगळ्या भागांत 42 खासगी बसांची तपासणी करण्यात आली, यामध्ये 19 बसचालकांकडून नियमांचे उल्लंघन झाल्याचे निष्पन्न झाले

**पुणे | प्रतिनिधी**

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर खासगी बसचालकांकडून जादा तिकीटदर आकारल्याच्या तक्रारी वाढत असून, यावर वचक बसावा म्हणून पुणे प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. पहिल्याच दिवशी शहरातील वेगवेगळ्या भागांत ४२ खासगी बसांची तपासणी करण्यात आली. यामध्ये १९ बसचालकांकडून नियमांचे उल्लंघन झाल्याचे निष्पन्न झाले असून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

दिवाळीच्या काळात रेल्वे व एसटी गाड्यांचे आरक्षण तुडुंब भरल्यामुळे अनेक प्रवासी खासगी बससेवेकडे वळतात. याच संधीचा फायदा घेत काही बसचालक ठरवून दिलेल्या दरापेक्षा अधिक दर आकारतात. त्यामुळे प्रवाशांना आपल्या गावी जाताना आणि परतताना आर्थिक फटका बसतो.

दिवाळीमध्ये खासगी बसचालक जादा तिकिट दर घेतल्याच्या तक्रारी वारंवार येत असतात. त्या पार्श्वभूमीवर पुणे प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) पहिल्याच दिवशी वेगवेगळ्या भागात ४२ खासगी बसची तपासणी केली. त्यापैकी १९ बस चालकांनी नियमांचे उल्लघन केल्यामुळे दंडात्मक कारवाई केली. त्यामुळे खासगी बसचालकांवर वचक बसला.मागील तीन ते चार दिवसात काही चालकांकडून तिकिट दरवाढीबरोबरच अन्य तक्रारी आरटीओकडे आल्या आहेत. त्याची शहानिशा करून पुढील कारवाई होईल असे आरटीओकडून सांगण्यात आले.

दिवाळीमध्ये बाहेरगावी जाणाऱ्यांची मोठ्या प्रमाणात गर्दी असते. विशेषत: रेल्वेचे बुकिंग एक महिना अधीच फुल्ल होते. जादा गाड्यांना मोठी गर्दी असते तर दुसरीकडे एसटीचे बुकिंग फुल्ल आणि गाड्या भरून धावत असतात. पर्यायाने नागरिकांना खासगी बसने जाण्याशिवाय पर्याय राहत नाही. याचाच फायदा घेत काही खासगी बसचालक ठरवून दिलेल्या दरापेक्षा अधिक दर आकारून प्रवाशांची लूट करतात. त्यामुळे प्रवाशांना दिवाळीत गावी जाताना जादा तिकिटदराचा भुर्दंड सोसावा लागतो.

या बसचालकांवर वचक बसावा, जादा तिकिटदर आकारू नये यासाठी आरटीओ कार्यालयात सर्व बस मालकांची बैठक बोलावून सूचना दिल्या. तसेच पहिल्याच दिवशी आरटीओच्या पथकाने बसची तपासणी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बसवर कारवाईही केली. त्यानंतर काही बसचालकांनी नियमाप्रमाणे वाहतूक केली.



### आरटीओकडून कडक पावले

» तक्रारींच्या अनुषंगाने आरटीओने सर्व खासगी बसमालकांची बैठक घेऊन दरवाढ करू नये व नियमांचे पालन करावे अशा सूचना दिल्या होत्या. त्यानंतर तपासणीसाठी आरटीओचे पथक मैदानात उतरले. नियम मोडणाऱ्या १९ बसचालकांवर कारवाई झाल्यामुळे इतर चालकांनी नियमांचे पालन सुरू केले असल्याचे आरटीओने स्पष्ट केले.

### परतीच्या प्रवासासाठीही 'जादा दर'चा धोका

» दिवाळीनंतर परतीच्या प्रवासासाठीही खासगी बसचालक जादा दर आकारतात, अशी तक्रार आरटीओकडे प्राप्त झाली आहे. त्याचीही शहानिशा करून आवश्यक ती कारवाई केली जाईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. नागरिकांनी कोणत्याही प्रकारची फसवणूक झाल्यास तातडीने आरटीओकडे संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

### कारवाई सुरूच राहणार

»जादा दर, परवाना नसणे, विमा नसणे, तसेच वाहतुकीच्या इतर नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बसांवर कारवाई पुढेही सुरू राहणार असल्याचे संकेत आरटीओने दिले आहेत. त्यामुळे खासगी बसचालकांनी नियमांचे पालन करावे, अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा देण्यात आहे.

# महावितरणच्या कारभाराचा फटका; भुकुम, भूगावमध्ये वारंवार वीजपुरवठा खंडित

## नागरिकांसह व्यावसायिकांचे मोठे नुकसान, मागील काही महिन्यांपासून या दोन्ही गावांमध्ये सातत्याने वीजपुरवठा खंडित


**पुणे | प्रतिनिधी**

दिवाळीसारख्या महत्त्वाच्या सणासुदीच्या काळात मुळशी तालुक्यातील भुकुम आणि भूगाव येथील नागरिकांना महावितरणच्या गलथान कारभाराचा मोठा फटका बसत आहे. मागील काही महिन्यांपासून या दोन्ही गावांमध्ये सातत्याने वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार घडत असून, ऐन दिवाळीच्या उत्साहावर अंधाराचे सावट पसरले आहे. दररोज सकाळच्या वेळेत वीज जाण्याची समस्या गंभीर बनली असून, हे अघोषित भारनियमन आहे का, असा संतप्त सवाल स्थानिक नागरिक उपस्थित करत आहेत.

दिवाळीच्या काळात घरांमध्ये रोषणाई, फराळ बनवणे आणि इतर महत्त्वाच्या कामांची लगबग असताना वीज गुल झाल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. सकाळच्या वेळेत नागरिक कामावर जाण्याच्या तयारीत असताना किंवा विद्यार्थी ऑनलाईन शिक्षण घेत असताना वीज खंडित होत असल्याने वेळेचा मोठा अपव्यय होत आहे. या दोन गावांमध्ये नागरीकरण वाढल्याने अनेक लहान-मोठे व्यावसायिक आणि दुकानदार आहेत. वारंवार वीजपुरवठा खंडित झाल्याने त्यांच्या व्यवसायावर थेट परिणाम होत आहे.

दुकानदारांना आणि लघुउद्योजकांना जनरेटरचा खर्च परवडत नाही. त्यामुळे वीज येईपर्यंत त्यांना आपला व्यवसाय थांबवावा लागत आहे. त्यामुळे मालाचे नुकसान होण्यासह वेळेवर कामे पूर्ण न झाल्याने आर्थिक फटका बसत असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. वाढते नागरीकरण आणि विजेच्या मागणीनुसार उपकेंद्र स्थापन करणे, ट्रान्सफॉर्मरची क्षमता वाढ आणि वितरण वाहिन्यांचे जाळे अद्ययावत न केल्यामुळे अशाप्रकारे वारंवार वीजपुरवठा खंडीत होण्याच्या घटना घडत असल्याचे स्पष्ट होत आहे.

ऐन सणासुदीच्या काळात वीज खंडित होणे हे महावितरणच्या अनास्थेचे प्रतीक आहे. वाढत्या शहरीकरणाला आवश्यक पायाभूत सुविधा पुरवण्यात महावितरण अपयशी ठरत असल्याचे या प्रकारावरून दिसून येते.




### पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष

» भुकुम आणि भूगाव ही गावे पुणे शहरालगत असल्याने येथे मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले आहे. मोठमोठी गृहसंकुले आणि व्यावसायिक आस्थापना येथे कार्यरत आहेत. एका बाजूला शहरीकरण वेगाने होत असताना, दुसऱ्या बाजूला महावितरण कंपनीने मात्र गेल्या १५ वर्षांपासून येथील वीज वितरण प्रणालीच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचे स्थानिक नागरिक आणि व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.